ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 6 | FEBRUARY - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

होळकरांची टपाल व्यवस्था
महेश्वर ते पुणे टपाल व्यवस्थेच्या विशेष संदर्भात

प्रा.डॉ.शिवाजी वाघमोडे
इतिहास विभाग प्रमुख , भारत महाविद्यालय,जेऊर ,
ता.करमाळा जि. सोलापूर.

प्रस्तावना :

पेशवेकाळात स्वतंत्र व सार्वजनिक टपालखाते अस्तित्वात नसले तरी पत्रव्यवहार, बातम्या, कागदपत्रे, चिठ्ठया, हलक्या वजनाच्या वस्तू आदिंची वाहतुक करण्यासाठी सुव्यवस्थित यंत्रणा तयार झाली होती. टपालास `डाक`हा शब्द वापरला जात असे. पेशवे,मराठा सरदार यांना राज्यातील माहिती कळण्यासाठी, आपल्या अधिकाऱ्यांना सुचना,आज्ञा देण्यासाठी,लष्करी मोहिमा,युध्दे यांची माहिती मिळण्यासाठी आणि एकुणच राज्यकारभार,संपर्क या दृष्टीने टपाल यंत्रणा उभी करणे अत्यावश्यक होते. पेशवे, होळकर, शिंदे आदिंनी टपालाची खास व्यवस्था केलेली होती त्यास सरकारी टपाल म्हटले जात असे. मोठया सरदारांच्या केंद्र ठिकाणांपासुन ते पुणे शहरापर्यंत नियमित टपाल व्यवस्थाही पेशवे काळात होती. तसेच व्यापारी,सावकार यांच्या मार्फत देखील हंगामी आणि नियमित स्वरुपात टपाल व्यवस्था वेगवेगळया ठिकाणांपर्यंत चालू असे. होळकरांनी महेश्वर ते पुणे या टप्प्यात आणि उत्तरेकडील अनेक महत्वाच्या ठिकाणांपर्यंत कायमस्वरुपी टपाल व्यवस्था उत्तम प्रकारे चालविली होती. या टपाल व्यवस्थेचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

जेंव्हा युध्द मोहिमा चालू असत तेंव्हा लष्करापासून मुख्य ठिकाणांपर्यत टपाल नेण्या-आण्यासाठी हंगामी स्वरुपाची व्यवस्था केली जाई. अशी नैमित्तीक किंवा हंगामी व्यवस्थाकरण्याला डाक बसविणे असे म्हणत.[१] टपालाच्या संदर्भात प्रामुख्याने गाव टपाल, सावकारी टपाल आणि सरकारी टपाल असे तीन प्रकार असत. गावचे टपाल म्हणजे कागदपत्रे,निरोप किंवा सांगावा पोहचविण्याचे काम गावातील महारामार्फत होत असे. सावकार लोक हे केवळ पैशाचीच उलाढाल करीत नसत तर त्यांचे व्यापार व सराफीधंदेही मोठया प्रमाणात चालू असत. हुंडया,वराता,चिठ्ठया,पत्रे यांची वाहतुक करण्यासाठी त्यांना टपालव्यवस्थेची नितांत गरज होती. त्यामुळे त्यांच्यामार्फत टपाल वाहतुकीची व्यवस्था केली जाई. अशा टपालास सावकारी टपाल म्हटले जात असे.अशा सावकारी टपाल यंत्रणेमार्फत खाजगी लोकांच्या टपालांचीही ने-आण करण्यात येत होती. पेशवे काळात सावकारी टपालास खूप महत्व प्राप्त झाले होते.टपालाची वाहतुक करणाऱ्या मंडळींसाठी ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये जासुद, कासिद, हरकरा, राऊत, सांडणीस्वार, महालदार, खासबरदार, ढालाईत, नाईक, फडनाईक, वार्ताहर, खिजमतगार, दूत, मुजरद, बारीदार अशा अनेक संज्ञा वापरलेल्या दिसून येतात. टपाल व्यवस्थेशी निगडीत असणाऱ्यांना अशी विविध नावे असली तरी त्यांचे काम टपाल पोहचविण हेच होते. टपाल पोहचविण्याचे काम करणाऱ्यांचे जथ्थे म्हणजेच गट असत. अशा जथ्थ्यांच्या प्रमुखांना जथ्थेदार म्हटले जाई. विशिष्ट ठिकाणी विशिष्ट मोबदल्यावर पत्रे पोहच करण्याचा करार करणाऱ्यांस अजुरदार म्हणत.[२] अशा जथ्थेदार किंवा अजुरदारांशी करार करुन त्यांना टपाल वाहतुकीचे काम देण्यात येत असे. खाजगी लोक, सावकार,सरकार यांची टपाल वाहतुकीची कामे नैमित्तीक,हंगामी किंवा नियमित स्वरुपात असे जथ्थेदार,अजुरदार स्विकारीत असत.काही जासुद,कासिद यांचा स्वतंत्ररीत्याही टपाल वाहतुकीचा व्यावसाय असे. करारी किंवा वायदेवाले,इनामी असे त्यांचे प्रकार होते. सैन्यामध्ये जासुद,कासिद,हरकारे वगैरेंची खास नेमणुक केली जात होती.

पत्र व्यवहार थैलीतून केला जाई. त्यास लखोटा म्हणण्याचा प्रघात मराठा काळात होता. मराठा साम्राज्याच्या विविध भागात टपाल पोहचविण्यासाठी सर्वसाधारणपणे पाच कोसाचा एक टप्पा पाडण्यात येत असे. पत्र वाहतुकीच्या मार्गावर ठिकठिकाणी डाक चौक्या निर्माण करुन प्रत्येक टप्प्यावर कासिद जोडी तयार ठेवली जाई. एका टप्प्यावरील कासिद दुसऱ्या टप्प्यावरील कासिदच्या हवाली पत्र थैली करीत असे. तेथुन पुढच्या सर्व टप्प्यांवर अशीच कार्यवाही केली जाई. अशा पध्दतीने प्रेषकापासून निघालेले पत्र प्रपाकापर्यंत टप्प्याटप्प्याने पोहचते केले जात असे. कासिद पायी मार्गक्रमण करीत असत. लांब पल्ल्याचे टपाल पोहचविण्यासाठी घोडे,उंट यांचा वापर केला जाई.

होळकरांनी सुरु केलेली महेश्वर ते पुणे ही नियमित डाक सेवा महत्वाची होती. तसेच उत्तर भारतातील बातम्या आणि पत्रव्यवहार पुण्यापर्यंत चालु राहण्यात या डाक व्यवस्थेचा खूप मोठा वाटा होता. उत्तरेकडे मोहिमांवर असणाऱ्या सरदारांचे पत्रव्यवहार लष्करातून महेश्वर पर्यंत पोहचते केले जात असत आणि तेथून पुणे दरबारात किंवा इतरत्र ही पत्रे,महिती पाठविली जाई. होळकर, शिंदे, पवार,राजपूत राजे, उत्तरेतील अन्य महत्वाच्या व्यक्ती यांच्याकडील बातम्या, पत्र व्यवहार आणि महत्वपुर्ण घडामोडींचे आशय महेश्वर दरबारातील बातमीदारांनी पेशव्यांना वेळोवेळी पाठविलेले दिसून येतात. याच प्रमाणे उत्तरेमध्ये रवाना करायची पत्रे महराष्ट्रातून महेश्वरपर्यंत पोहचती केली जात व तेथून संबंधीताकडे पाठविण्यात येत असत.[३] मल्हारराव, तुकोजी हे सातत्याने युध्द मोहिमांवर दूरवरच्या प्रदेशात फिरत असल्याने होळकरांच्या लष्करापासुन ते महेश्वरपर्यंत डाक बसविली जाई. होळकरांचे वकील विविध ठिकाणच्या राज्यकर्त्यांच्या दरबारात होते. तसेच इतरांचेही वकिल होळकर दरबारात होते. त्यामुळे नागपूर, हैद्राबाद, जयपूर, उदपूर, आयोध्या, ग्वाल्हेर, लखनौ, कोटा , प्रतापगड अशा महत्वाच्या ठिकाणांपासून महेश्वर पर्यंत पत्रव्यवहाराची सातत्याने आदान प्रदान चालू असे.[४]

महेश्वर ते पुणे या नियमित डाक व्यवस्थेमध्ये प्रारंभी पाच कोसाच्या अंतरावर एक कासिद जोडी ठेवलेली होती. इ.स.१७९२ मध्ये या मार्गावरील डाकेची माहिती खालील प्रमाणे मिळते.

४० महेश्वर पासून थाळनेरी पर्यंत कोस
४० थाळनेरहून चांदवड पर्यंत कोस
३० चांदवडहून संगमनेरपर्यंत कोस
४२ संगमनेरहून पुण्यापंत कोस
१५२

यांसी कासिद जोडया पांच कोसांवर जोडी १ प्रमाणे जोडया ३४ यांस दरमहा रुपये
२४० डाकचौकीच्या जोडया ३० असाम्या ६० दर ४ प्रमाणे रुपये.
४८ सरबराईच्या जोडया ४ असाम्या ८ दर ६ प्रमाणे [५]
२८८

उपरोक्त माहितीवरुन असे समजते की, पुणे ते महेश्वर दरम्यानचे अंतर थाळनेर - चांदवड-संगमनेर मार्गे १५२ कोसांचे होते. डाक पोहचविण्यासाठी या मार्गावर ३४ कासिद जोडया म्हणजेच ६८ माणसे कार्यरत होती. या डाक व्यवस्थेवर होळकरांचा दरमहा २८८ रुपये खर्च होत होता. तसेच प्रत्यक्ष प्रपाकापर्यंत पत्र पोहच करणाऱ्या कासिदांना डाक चौक्यांवरील कासिदांपेक्षा अधिक वेतन दिले जात असल्याचेही स्पष्ट होते.

इ.स.१७९३ साली डाक चौक्यांचे म्हणजेच टप्प्यांचे अंतर दुपटीने वाढविले होते. पाच कोसांऐवजी दहा कोसांचा टप्पा करण्यात येऊन यावर्षी होळकर सरकारने महेश्वर ते पुणे या डाक व्यवस्थेचे कंत्राठ जथ्थेदारास दिले होते. पुण्यापर्यंत किती कासिद जोडया होत्या तसेच या मक्त्यातील नियम,अटी,मासिक खर्च या बद्दल १३ एप्रिल १७९३ च्या करारपत्रातून सविस्तर माहिती मिळते.

'यादी डाकेच्या चौक्या महेश्वरपासुन पुणियापर्यंत दहा कोसांचे टप्प्याने मार्फत पद्मसी राजसी सावकार गुजारत भगवान कासिद नथे मानधाता मिरधा सन १२०२ शके १७१५ कासिद जोडया सुमारी २० दरमहा मक्ता यणे प्रमाणे.

१) १ नावडा तावडीस जोडी	२) १ बलकवाडा जोडी
३) १नागलवाडी जोडी	४) १ थोवरगड जोडी
५) १ सांगवीस जोडी	६) १ थाळनेरास जोडी
७) १ कापडणे जोडी	८) १ लळींग जोडी
९) १ टोकेस जोडी	१०) १ मालेगाव जोडी
११) १ दहिगाव जोडी	१२) १ पाटोदे जोडी
१३) १ शेरास जोडी	१४) १ संगमनेरास जोडी
१५)१ आंबे धारगांव	१६) १ आळे जोडी
१७) १ लोणी जोडी	१७) १ भीमेचे काठी जोडी
१९) १ पुणे जोडी	२०) १ सरबरा जोडी

ऐकुण वीस जोडयांचा रोजमुरा मक्ता रुपये २०४ दोनशेचार दरमहाचे दरमहा पावत जाईल. पत्रे पुणियाहून महेश्वरी येतील. पुणियास साडेपांच सहा दिवसांचे मुदतीने नेत आणीत जावीत. कदाचित सात आठ दिवसांचे मुदतींचे कागद येऊ जाऊ लागल्यास मक्त्यांत कमी केले

जाईल. कागदपत्रांची गफलत होऊ देऊ नये. गफलत झाल्यास पैका सावकार मजकूर यांचे विद्यमाने माघारा घेतला जाईल. यणेप्रमाणे करार सदरहु दोनशेचार रुपयाची चिठ्ठी पदमसी राजसी याजवर करुन देणे.....'[६]

सदर करारनाम्याच्या यादीवरुन पुणे ते महेश्वर दरम्यानचा पत्रव्यवहार सहा दिवसाच्या अवधीत पोहचविण्याचे बंधन घालण्यात आलेले आहे,यापेक्षा उशीर लागल्यास ठरलेल्या रकमेतून कपात केली जाईल तसेच पत्रांची अदलाबदल झाल्यास, गहाळ झाल्यास पैसे परत घेतले जातील हे देखील स्पष्ट केले असल्याचे दिसून येते. या मार्गावर जथ्थेदाराने २० कासिद जोडया म्हणजेच ४० माणसे दहा - दहा कोसांच्या अंतरावर नियुक्त केली होती. जथ्थेदारास कासिदांच्या रोजमुऱ्यासाठी दरमहा २०४ रुपये या कामासाठी देण्यात येत होते. इ.स.१७९२ मधील कासिदांचे वेतन प्रत्येकी दरमहा ४ रुपये होते हे विचारात घेता मक्ता घेणाऱ्या जथ्थेदारास या कामातून बराच नफा मिळत होता हे उघडपणे दिसते.

होळकरांप्रमाणेच पेशवे व अन्य मराठा सरदारांकूनही डांक बसविली जात असे. तसेच ठिकठिकाणी त्यांच्या कासिद जोडया ठेवलेल्या असत. महेश्वर ते पुणे ही होळकरांची नियमित डाक सेवा असली तरी पेशव्यांच्या मार्फत स्वतंत्र कासिद जोडया ठेवून पत्रव्यवहार सतत होत राहील याची दक्षता घेतली जात होती. महेश्वर दरबारात पेशव्यांच्या वतीने असणाऱ्या विठ्ठल शामराज आणि केसो भिकाजी दातार यांच्या दिमतीला अशा काशिद जोडया पेशव्यांनी ठेवल्या होत्या.[७] पेशवे काळात ज्या ठिकाणी टपाल पोहचविण्याची काहीच व्यवस्था नसे, त्या ठिकाणी पत्रे घेऊन स्वतंत्र,हरकारे,जासुद पाठविले जात असत. अत्यंत तातडीची पत्रे पाठविण्यासाठीही स्वतंत्र जासुद रवाना केले जात होते. पत्रे पोहचविण्याचा व्यावसाय करणारे लोकही त्याकाळी होते. ठराविक रक्कम घेऊन पत्रे पोहचविली जात. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणा पर्यंतचे अंतर आणि पत्र पोहचविण्याचा कालावधी यावर ही रक्कम ठरविली जाई. इ.स.१७५३-५४ मध्ये दिल्ली येथील बापूजी महादेवकडे पेशव्यांनी पत्रे घेऊन पाठविलेल्या कासिदास तो सोळाव्या दिवसी दिल्लीस पोहचल्यास ५० रुपये,सतराव्या दिवसी पोहचल्यास ४० रुपये अठराव्या दिवसी ३० रुपये आणि त्यानंतर पोहचल्यास काहीही देऊ नये असा स्पष्ट उल्लेख केला होता.[८] यावरुन दिल्लीपर्यंतचे अंतर पुर्ण करण्यास १६ ते १७ दिवसाचा कालावधी अजुरदारांना दिला जाई असे म्हणता येईल. महेश्वर ते दिल्ली हे आंतर कासिदांनी १३ दिवसात पार करुन दिल्लीस पोहचावे अशी साधारण अपेक्षा असे. प्रती दिवसासाठी ३ रुपये हा जासुदांचा उच्च मोबदला होता.[९]

महेश्वर ते पुणे या दरम्यान पत्रे सहा दिवसाच्या आंत पोहचावीत असे मागील करारनाम्यात आलेले आहे. म्हणजेच पत्र वाहतुक शक्य तेवढया जलद गतीने होईल याची काळजी संबंधीत लोकांकडून घेतली जाई. कधी कधी मात्र त्यात आडचणी उद्‌भवत असत. पुण्याहून पेशवे सरकारची पत्रे कुकरमुंडे येथील कमाविसदार नारो हरी याच्यापर्यंत पोहचली होती. त्याने ती पुढे तुकोजी होळकर यांच्या लष्करात डाकेबरोबर रवाना करावीत असे सुचविले होते. परंतु रखमाबाई होळकर यांच्याकडून पाठविलेली पत्रे घेऊन तेथील जासुद लष्कराकडे रवाना झाले होते आणि काही दिवसांपुर्वीच डाकही उठली होती.त्यामुळे नारो हरीची मोठी पंचाईत झाली होती. तेंव्हा तो लिहितो की, '..... पुण्याहुन लखोटे आले ते जलद गेले पाहिजे. येथे तो एकही जासुद नाही. तरी जासुदा बरोबर एक माणुस देऊन कासिद आपले दस्तक घेऊन गेले. त्याज पावेतो पाठवावे अथवा ते नच अटोपले तरी थेट लष्कर पावेतो दयावे. सरकारचे नाजुक काम आहे. यास्वत लिहिले असे...'[१०] म्हणजेच रखमाबाई होळकर यांनी दुसरा जासुद पाठवून यापूर्वी मार्गस्थ झालेल्या जासुदांपर्यंत ही पत्रे पोहचवावीत. पुढच्या व मागच्यांची भेट होऊ शकली नाही तर त्यांनी लष्करापर्यंत जाऊन पत्रे दयावीत अशी विंनती नारो हरी याने केली आहे. अहिल्याबाईंनी मोहिमेवर असणाऱ्या तुकोजी होळकरांस दररोज एक पत्र डांकेत लिहुन दयावे अशी ताकीद आपल्या कारभाऱ्यांना दिली होती अशी माहिती एका बातमी पत्रात मिळते. यावरुन लष्करापासून महेश्वर पर्यंत दैनंदिन टपाल व्यवस्था चालत असे हे स्पष्ट होते.

कासिद, जासुदांना डोंगर, नदया, जंगले यातून प्रवास करावा लागत असल्याने शत्रू, चोर, लुटारु, यांच्याकडून त्रास होणार नाही याची खबरदारी सरकार घेत असे. तरीही काही संकट आल्यास किंवा कासिद आजारी पडल्यास एकाची दुसऱ्याला मदत व्हावी,एक शत्रूच्या हाती पडल्यास निदान दुसरा तरी प्रपाकापर्यंत पोहचावा या उद्‌देशाने जासुदांची जोडी असे. जासुदांच्या राहण्याची सोय करण्याची आणि नदी,नाले,जंगल पार करुन देण्याची जबाबदारी गावच्या पाटलांवर व इतर स्थानिक अधिकाऱ्यांवर होती. सरकारकडून कासिदांना काय सुविधा पुरविल्या जात होत्या हे समजण्यासाठी विठ्ठल शामराज याने महेश्वरहून पुण्यास ८ जून १७८३ रोजी पाठविलेल्या पत्रातील मजकुर खूप महत्वाचा वाटतो. तो लिहितो की, '..... कासीद जोडया ये प्रांती यांच्या तालुक्यांत (होळकरांच्या) जागां जागां आहेत. त्या गावोगांव कासीद जोडयांस दोघांचे दळण व लाकुड फाटे व रातबिरात माणुस रहादारीस द्यावे,हा दस्तुर कोठही आहे. चालतच आहे. येथेही देवविंतांत. परंतु हा देश मवास,जागां जागां भिल्लांची वस्ती, यामुळे दळाई व लांकडाचे रातबिरातच्या माणसांचे नित्य बोभाट येतात ; यांसी कटकट करीतच आहे. सांप्रत पर्जन्य काळ आला. कासिदांस पाणी पावसाचे आसरा पाहिजे. यास्तव कासीद येथे आले की, ज्या गावी जोडी आहे त्या गाववाल्यांस ताकिद करवुन,छपर अगर आसरा काही करुन देववा म्हणून आले. यास्तव बाईकडे जाऊन विनंती केली....''[११]

इ.स.१७८९ च्या १३ ऑक्टोबर रोजी केसो भिकाजी पुणे दरबारास कळवितो की '..सरकारांतुन डांकेविषयी पत्र गंगाजलनिर्मळ अहिल्याबाई होळकर यांस आले. त्यांत डाकेच्या कासदास पाणी व दोन दोन शेर दळुन रातबिरात वाटाडया देत जाणे म्हणोन. त्यावरुन पत्र सरकारचे दिल्हे. पत्र ऐकुन, डांकेचे प्रयोजन काय? कोठवर बेगारी गाववाल्यांनी कराव्या ? चार डांका बसल्या, या डाकेचे कारण काय ? जागा मात्र देऊं रातचाल बेगारी देऊं. वरकड सरपण, पाणी व दळण देत नाही! साफ उत्तर दिले. .....मग सराकारचे दस्तकाप्रमाणे त्यांचे तालुक्यांत

गांवबगांव डांक आहेत तेथील कमाविसदारांस पत्रे घेऊन मागाहुन सरकारचे कारकुनाकडे रवाना केली. ते उज्जनीस गेले डांकेचा बंदोबस्त जाला...'[१२] या पत्र मजकुरातून अहिल्याबाईंनी पेशव्यांच्या कासिदांना सुविधा देण्यास नकार दर्शविल्याचे स्पष्ट होते. नकाराचे प्रमुख कारण असे की, या मार्गावर सध्या चार डांका बसलेल्या असताना, या डाकेची गरज नसतानाही पेशव्यांनी ही पाचवी डाक सुरु केली होती. आम्हाला व आमच्या गावक-यांना सरकारचा हा नाहक त्रास कशासाठी ? अशी अहिल्याबाईंची भूमिका दिसते. तरीही हरकुबाईच्या मध्यस्थीमुळे अहिल्याबाईंनी पेशव्यांच्या डाकेचा बंदोबस्त केला होता.

यशवंतराव होळकर यांना दादो मैराळ यांनी पुण्याहून अजुरदारामार्फत पत्र पाठविले होते. या कामाचे अजुरदारास १५ रुपये देण्याचेही नमूद केले होते. त्या प्रमाणे पत्र मिळाल्यावर पैसे देण्यात आले. पण या संदर्भात यशवंतरावांनी मैराळ यांची चांगली खरडपट्टी काढल्याचे एका पत्रावरुन समजते. तुमच्या जवळ आणि खंडो महादेव यांजजवळ होळकर सरकारचे जासुद, हरकारे ठेवलेले असताना मनस्वी अजुरा देऊन पत्र पाठविले हे बरोबर नाही. अजुऱ्याचे दर विचारात घेता विस कोसाचा एक रुपया दिला जातो. पुणे ते भानपुरा हे आंतर १८० कोस असल्याने अजुरदारास ९ रुपये दयावयास पाहिजे होते. परंतु तुम्ही ६ रुपये अधिक देण्याचे मान्य केले. तेंव्हा अजुरदाराने जास्त घेतलेले ६ रुपये पुण्यास तुम्ही माघारी घ्यावेत. तसेच यापुढे अजुरदारामार्फत पत्र पाठवायाचे झाल्यास विस कोसाचा एक रुपया या दराप्रमाणेच पाठवावे.[१३] असा यशंवतरावांच्या पत्राचा आशय आहे. म्हणजेच १९ व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात मराठा राज्यात सर्वसाधारणपणे विसकोसासाठी एक रुपया असा अजुरदारांचा टपाल वाहतुक दर होता. काही वेळा आंतर किंवा वेळ यांचा विचार न करता ठोक रक्कम ठरवून पत्रे नेण्या आणण्याचे काम दिले जाई. अजुरदारांमार्फत पाठविलेल्या पत्रांचा टपालखर्च पत्र स्विकारणाऱ्याने दयावयाची प्रथा पेशवाईत सर्वत्र होती. पाठविणारा फक्त किती रक्कम दयावी एवढे लिहून देत असे. या पध्दतीवरुनच पुढील काळात नॉटपेड पत्रे पोस्टाद्वारे पाठविली जाण्याची प्रथा पडली असावी. असे ना.गो. चापेकर आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावणेत नमूद करतात.[१४] डाकद्वारे किंवा स्वतंत्र जासुद, हरकारे यांच्या माध्यमातून पार्सल पाठविण्याची पध्दत देखील पेशवेकाळात होती.मकर संक्रातीचे तिळगुळ, पुस्तके, हलक्या वजनाच्या वस्तू पाठविल्याचे अनेक उल्लेख मिळतात.[१५] सावकारी डाकेत विमा उतरवून पार्सल पाठविण्याची व्यवस्थासुध्दा त्या काळातील टपालव्यवस्थेत दिसून येते.[१६]

निष्कर्ष :-

पेशवेकाळात दळणवळणाच्या साधनांचा विकास झालेला नसतानाही संपुर्ण देशाच्या कानाकोपऱ्यातून पत्र व्यवहार होत असे. सरकारी आणि सावकारी अशा दोन प्रमुख टपाल व्यवस्था होत्या. तसेच स्वतंत्र कासिद, जासुद, हरकारे यांच्याद्वारेही टपाल पोहचविले जाई. कासिद, जासुदांना शत्रू, चोर, लुटारु, यांच्याकडून त्रास होणार नाही याची खबरदारी सरकार घेत असे. इतर मराठा सरदार आणि खुद्द पेशव्यांपेक्षाही होळकरांची टपालव्यवस्था अधिक उत्तम दर्जाची होती. होळकरांनी टपालव्यवस्था उत्तम तऱ्हेने राखल्यामुळे राज्यावर नियंत्रण ठेवणे आणि व्यवहार गतिमान ठेवणे सोपे झाले. पुणे शहराला टपालयंत्रणेच्या बाबतीत उत्तर हिंदुस्थानशी जोडणारा अत्यंत महत्वाचा दुवा म्हणून होळकरांच्या महेश्वर ते पुणे डाक यंत्रेणेचा उल्लेख करता येईल.

संदर्भ :-

१.पारसनिस द.ब.संपा.महेश्वर दरबाराची बातमी पत्रे भाग-२ ,मुंबई १९११ पृ.१७४ ले. २०७ पृ.२०४ ले.२३६
भागवत अ.ना.संपा.होळकरशाहीच्या इतिहासाची साधने खंड १२ (ऐ.स्त्रि.प) ,इंदूर पृ.७-८ ले ८ पृ.१५ ले १६
२.कुलकर्णी एम.आर.नाना फडणीस आणि मराठी राज्यप्रशासन, पुणे २००४ पृ.१०२
३.पारसनिस द.ब.संपा. उपरोक्त. भाग-१, मुंबई १९१० पृ.१४४ ले ६१ भाग-२ पृ.७३ ले.८८ पृ.१२१ ले१४८ , पृ.१२५ ले १५२,पृ.१२७ ले १५५ पृ.१३९ ले.१७० पृ.१४९ ले १८१..
भागवत अ.ना.संपा. होळकरशाहीच्या इतिहासाची साधने भाग-१,इंदूर १९२४ पृ.१३९
४. पारसनिस द.ब.संपा. उपरोक्त. भाग -२ पृ.२० ले.२६,अहिल्या स्मारिका ,इंदूर - १९७३-७४ पृ.६-१४, १९७१ पृ.१०-११, १९७६ पृ.७८-८२, १९७८ पृ.२०-२५, १९८७ पृ.६-७, १९७९ पृ.५७-५९,
५. ठाकूर वा.वा.संपा. होळकरशाहीच्या इतिहासाची साधने भाग १ , इंदूर १९४४ अ.नं.३७६
६. तत्रैव. अ.नं.३९८
७.पारसनिस द.ब.संपा. उपरोक्त. भाग-१ पृ.८ ले.२ भाग-२ पृ.७२-७३ ले.८७पृ.९७ ले १२० पृ.१९८- १९९ ले.२३१ पृ.२०४ ले ३३६
८.भावे वा.कृ.पेशवेकालीन महाराष्ट्र , नवी दिल्ली ,१९७६ पृ.४०८
९.Sen Surendranath. Admistrative System of the Marathas , Culcutta 1976 P.285
१०.भागवत अ.ना.संपा. उपरोक्त. खंड१२ (ऐ.स्त्रि. प) पृ ५
११.पारसनिस द.ब.संपा. उपरोक्त.भाग-१ पृ.२०२-२०३ ले. ९८
१२. पारसनिस द.ब.संपा. उपरोक्त.भाग - २ पृ.१५० ले.१८२
१३.भागवत अ.ना.संपा. उपरोक्त. भाग-१ पृ.१४६ ले-९२

१४चापेकर ना.गो.पेशवाईच्या सावलीत,पुणे १९३७ पृ.४३
१५.पारसनिस द.ब.संपा. उपरोक्त.भाग-१ पृ.२१२ ले १०५
भागवत अ.ना.संपा. उपरोक्त. भाग-१ पृ.१०९
१६.चापेकर ना.गो. उपरोक्त. पृ.४२
अहिल्या स्मारिका ,इंदूर १९७८ पृ.४६